# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/05/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## विनयभंग

पो.स्टे. पारशिवनी :— दिनांक २२/०५/२०२३ चे ०८/०० वा. ते ०९/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले शेतात एकटीच हजर असता तिला यातील **आरोपी नामे— नवलचंद शंकर तिल्लेकर, वय अंदाजे ३५ वर्ष, रा. मेहंदी** हा फिर्यादीचे जवळ येवुन अश्लील शब्दात फिर्यादीला बोलला त्यामुळे फिर्यादीच्या मनात लज्जा निर्माण होवून तिचा विनयभंग झाला त्यामुळे फिर्यादीने हटकले असता फिर्यादी सोबत आरोपीने झगडा भांडण करून शिवीगाळ केली व कोणाला सांगितले तर मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (अ), ५०४, ५०६ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बासोडे हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. मौदा :— दिनांक २४/०५/२०२३ चे ०७/०० वा. ते १०/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी आपल्या शेतात कामाला गेले तेव्हा फिर्यादीची मुलगी व पत्नी व चुलत बहिण घरी हजर होते. फिर्यादी शेतातुन घरी परत आले असता त्यांची मुलगी हि घरून निघून गेली नातेवाईकांकडे शोध घेतला मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात आरोपीने तिला फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक निशांत मेश्राम ब. नं. १०१६ मो. क्र. ९७६३१६३१०७ हे करीत आहे.

<u>जबरी संभोग</u>

<u>पो.स्टे. खापरखेडा</u> :— दिनांक २२/०१/२०२३ चे १२/०० वा. ते दिनांक १८/०४/२०२३ चे १३/०० वा. दरम्यान फिर्यादी/पिडीता वय १७ वर्ष हिला यातील **आरोपी नामे— कौसर अफसर खान, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ४ वलनी** याने लग्नाचे आमिश दाखवुन वारंवार शारीरीक संबंध प्रस्थापित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (अ), ३७६ (२) (जे), ३७६ (२) (एन) भादवी सहकलम ४ बाल लैगीक संरक्षण अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मलकुवर मॅडम पोस्टे खापरखेडा मो. नं ९६२३६८७६१७ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर